**ठळक बातम्या**

- संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेच्या दिशेनं भारताची वाटचाल वेगानं होत असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचं प्रतिपादन

- प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत ७०  हजार कोटींहून अधिक खर्चाचे रस्ते बांधायला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

- भारताला आय अल्टीट्यूड पाणबुडी विरोधी यंत्रणा देण्याचा अमेरिकेचा निर्णय.

- जम्मू - काश्मीरच्या कुपवाडा जिल्ह्यात दारूगोळा आणि स्फोटकांचा मोठा साठा जप्त

**आणि**

- FIDE बुद्धीबळ स्पर्धेत मोरोक्को आणि जमैकावर मात करत भारताची दमदार सुरुवात

**<><><><><>**

संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेच्या दिशेनं भारताची वाटचाल वेगानं होत असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. भारतीय हवाई दलातर्फे राजस्थानात जोधपूर इथं आयोजित तरंग शक्ती विमान सरावाची पाहणी केल्यानंतर आज ते बोलत होते. या सरावाच्या निमित्तानं हवाई

दलानं आयोजित केलेल्या भारतीय संरक्षण हवाई प्रदर्शन म्हणजे आयडॅक्स-२४ चं उद्घाटन  संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या हस्ते झालं. आजपासून चौदा तारखेपर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनात विमानविषयक सामुग्री उत्पादन क्षेत्रातल्या कंपन्यांचा मोठा सहभाग आहे. अनेक उत्पादनं आणि तंत्रज्ञानांची चुणूक त्यात बघायला मिळणार आहे. यंदाच्या तरंग शक्ती सरावाचा हा दुसरा अंक असून त्यात १० देश सहभागी झाले आहेत, तर १८ देश निरीक्षक म्हणून उपस्थित आहेत.  तरंगशक्तीमध्ये भारत आणि मित्र देशांच्या हवाई सामर्थ्याची आणि नवनवीन आविष्कारांची चुणूक नागरिकांना बघायला मिळणार आहे.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रिमंडळानं २०२४-२५ ते २०२८-२९ या आर्थिक वर्षांसाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेची अंमलबजावणी करण्याचा ग्रामविकास खात्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे. या योजनेचा एकंदर खर्च ७० हजार १२४ कोटी रुपये इतका असणार आहे. केंद्रीय मंत्री आश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना ही माहिती दिली. दळणवळणाच्या कक्षेत नसलेल्या सुमारे २५ हजार पात्र गावांना जोडण्यासाठी ६२ हजार ५०० किलोमीटरचे रस्ते बांधण्यासाठी आर्थिक साह्य दिलं जाणार आहे. या योजनेमुळे चाळीस हजार मानवी दिवस इतक्या रोजगाराची निर्मिती होईल, असं वैष्णव यांनी सांगितलं.

सत्तर वर्षांवरच्या सर्व ज्येष्ठ नागरिकांचा आयुष्मान भारत पीएम जनआरोग्य योजनेत समावेश करायलाही मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यासाठी उत्पन्नाची मर्यादा नसेल. सर्व पात्र ज्येष्ठ नागरिकांना प्रति कुटुंब पाच लाख रुपयांपर्यंतच्या खर्चाचे उपचार अन्य योजनांच्या लाभाखेरीज अतिरिक्त मिळणार आहेत. हवामान बदलांशी जुळवून घेण्याच्या दृष्टीनं तयार करण्यात आलेल्या मिशन मौसमलाही सरकारनं मंजुरी दिली असून त्याकरता येत्या दोन वर्षांमध्ये दोन हजार कोटी रुपयांच्या खर्चाला मान्यता देण्यात आली आहे. केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्रालयातर्फे राबवल्या जाणाऱ्या या मिशन मौसममध्ये हवामान आणि वातावरणविषयक संशोधन आणि सेवांना आधार दिला जाणार आहे. २०२४-२५ ते २०२८-२९ या आर्थिक वर्षांमध्ये ३८ हजारापेक्षा जास्त ई-बसच्या खरेदीसाठी आर्थिक निधी देण्याचा निर्णयही काल मंत्रिमंडळानं घेतला. या निधीतून बसच्या खरेदीनंतर बारा वर्षांपर्यंत त्यांच्या देखभालीसाठीही व्यवस्था करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

भारतीय उद्योजकांना आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापार सुलभपणं करता यावा, या उद्देशानं तयार केलेल्या  ट्रेड कनेक्ट ई-प्लॅटफॉर्मचं उद्घाटन काल केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी नवी दिल्लीत केलं.

आंतरराष्ट्रीय व्यापार नियम, व्यापार करार, व्यावसायिक भागीदारी, सीमाशुल्क आणि परदेशी खरेदीदारांशी संबंधित असलेली सर्व माहिती या

ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून उद्योजकांना दिली आहे. ट्रेड कनेक्ट ई-प्लॅटफॉर्मची निर्मिती विविध मंत्रालये, संस्था आणि संस्थांच्या सहकार्यानं केली असून त्यात काही महत्त्वाची आकडेवारी उद्योजकांना मिळणार असल्याचं गोयल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

पाच दिवसांच्या गणपतींना काल निरोप देण्यात आला. मुंबईत काल सुमारे ३७ हजार घरगुती आणि १ हजार सार्वजनिक गणपतींचं विसर्जन झालं. बृहन्मुंबई महानगर पालिकेनं त्यासाठी कृत्रिम तलावांची सुविधा उपलब्ध करून दिली होती. राजभवन इथल्या गणपतीचं विसर्जनही राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या सूचनेनुसार, आवारातल्या कृत्रिम हौदात करण्यात आलं. राज भवनात स्थापन केलेली शाडूची मूर्ती नाशिक मध्यवर्ती कारागृहातल्या एका कैद्यानं बनवली होती.

आज गौरींचं विसर्जन होणार आहे. काल घरोघरी या माहेरवाशिणींची पूजा करून गोडाधोडाचं जेवण देण्यात आलं. आजच्या विसर्जनासाठी मुंबईतल्या वाहतुकीचं नियमन करण्यात आलं असून पोलिसांनीही चोख बंदोबस्त ठेवला आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यांमध्ये आज

आपण जाणून घेणार आहोत, ऑस्ट्रिलियामधल्या गणेशोत्सवाविषयी.

<><><><><>

हाय अल्टिट्युड अँटी सबमरिन वॉरफेअर हे पाणबुडीरोधक युद्ध तंत्रज्ञान अमेरिका भारताला विकणार आहे. ५ कोटी २८ लाख रूपये किमतीचं हे तंत्रज्ञान असून त्यामुळे भारताला एमएच ६० आर या हेलिकॉप्टरमधून पाणबुड्यांवर मारा करता येईल. या प्रस्तावित व्यवहारामुळे भारत आणि अमेरिकेतल्या द्वीपक्षीय संबंधांना नवे आयाम मिळणार असल्याचं अमेरिकेच्या संरक्षण विभागानं म्हटलं आहे.

<><><><><>

जम्मू - काश्मीरच्या कुपवाडा जिल्ह्यात सुरक्षा दलांनी दारूगोळा आणि स्फोटकांचा मोठा साठा जप्त केला आहे. यासंदर्भात मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे लष्कर आणि जम्मू काश्मीर पोलीस यांनी केरन विभागात संयुक्तपणे ही कारवाई केली. त्यात ए के-४७ आणि आर.पी.जी च्या फैरी तसंच ई ए डी आणि हातबॉम्ब यांचा मोठा साठा हाती लागला. विशेष निवडणूक निरीक्षकांकडून ह्या संदर्भातली खबर कळल्याचं श्रीनगर इथल्या संरक्षण दलाच्या प्रवक्त्यानं सांगितलं. यामुळे मोठा धोका टळला असून यामुळे इथली परिस्थिती स्थिर आणि शांत राहू शकेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><><>

'मुंबई महानगर क्षेत्रः जागतिक आर्थिक केंद्र म्हणून विकास' या निती आयोगाच्या अहवालाचं आज मुंबईत प्रकाशन होणार आहे. यावेळी MMRDA अर्थात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधीकारण आणि वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम यांच्यात सामंजस्य करार करण्यात येणार आहे. मुंबईतल्या सह्याद्री अतिथीगृहात दुपारी साडेतीन वाजता हा कार्यक्रम होईल. यात वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक आणि कार्यकारी अध्यक्ष क्लॉस श्वाब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

केरळ राज्यसरकारने पाच राज्यांच्या अर्थमंत्र्यांची बैठक आज राजधानी तिरुवअनंतपुरम इथं आयोजित केली आहे. केरळ खेरीज तमिळनाडू, कर्नाटक, तेलंगण आणि पंजाब या राज्यांचे अर्थमंत्री त्यात सहभागी होणार आहेत. केंद्र – राज्य संबंधांचा आर्थिक पैलू आणि १६ व्या वित्त आयोगात राज्यांना न्याय्य वाटा मिळवण्याच्या दृष्टीनं मोर्चेबांधणी हे या बैठकीचं उद्दिष्ट आहे. माजी केंद्रीय आर्थिक सल्लागार डॉ अरविंद सुब्रमणियन बैठकीत मार्गदर्शन करणार आहेत.

<><><><><>

हरियाणातल्या आगामी विधानसभा निडवणुकीसाठी आम आदमी पार्टीने आज दोन याद्या जाहीर केल्या असून यात २२ उमेदवारांच्या नावांचा समावेश आहे. यात प्रेम गर्ग हे पंचकुला मतदारसंघातून, कमल बिसला फतेहबादमधून, केतन शर्मा अंबालामधून आणि धीरज कुंदु दादरी

मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. नूह इथून रबिया किडवई, तर जगधरीमधून आदर्शपाल गुज्जर निवडणूक लढवणार आहेत. तर काल जाहीर केलेल्या पाचव्या यादीत नऊ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली.

**<><><><><>**

४५ व्या FIDE बुद्धीबळ स्पर्धेच्या कालच्या पहिल्याच दिवशी भारताने खुल्या गटात मोरोक्कोवर आणि महिलांच्या गटात जमैकावर मात करत दमदार सुरुवात केली. सुरुवातीच्या सामन्यात डी गुकेश हा पहिल्या फेरीतून बाहेर पडल्यानंतर आर प्रज्ञनंद यानं सर्वोत्तम खेळ करत मोरोक्कोच्या तिसीर मोहम्मद याला पराभूत केलं. त्यानंतर विदित गुजराथी याने औखीर मेहदी पिएर याला आणि पेंताला हरिकृष्णा याने मोयाद अनास याला हरवलं. तर अर्जुन एरिगसी यानं एल्बिया जॅक्स याला नमवत भारताचा ४-० असा विजय निश्चित केला.

महिलांच्या गटात वैशाली हिनं ऍंडनी क्लार्कचा, तनिया सचदेवनं  गॅब्रिएला वॉट्सनचा आणि दिव्या देशमुखने रचेल मिलर हिचा पराभव केला. तर वंतिका अग्रवालचा रेहन्ना ब्राऊनसोबतचा सामना बरोबरीत सुटला.

**<><><><><>**

अफगाणिस्तान आणि न्यूझीलंड दरम्यानच्या एकमेव क्रिकेट कसोटी सामन्याचा आजचा सलग चौथ्या दिवसाचा खेळही पावसामुळे रद्द करावा लागला. उत्तर प्रदेशात ग्रेटर नोएडा इथल्या शहीद विजय सिंह पथिक स्टेडियममध्ये आयोजित हा सामना एकही चेंडू टाकल्याविनाच रद्द होण्याची

शक्यता असून उद्या सकाळी याबाबतचा निर्णय घेतला जाईल, असं सामनाधिकारी जवगल श्रीनाथ यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रासह **मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशात** काही ठिकाणी आगामी चार दिवसांत जोरदार पाऊस होईल, असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागानं व्यक्त केला आहे. तसंच **बिहार, ओडिशा, झारखंड, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरा** इथे उद्या जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. **मध्य भारत, कोकण, गोवा आणि गुजरातमध्ये** बहुतांश ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पुढच्या आठवड्यात होऊ शकेल.

**//<><><><><>//**